# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय दि. ०२/०३/२०१९ अन्वये **{सामान्य प्रशासन विभाग}** सातव्या वेतन आयोगामध्ये तीन लाभांच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेनुसार मंजूर केलेल्या १०, २० व ३० वर्षाच्या नियमित सेवेनंतर नागपूर महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचारी यांना उक्त शासन निर्णयातील तरतुदीनुसार सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या ३ लाभास मंजुरी देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

शासन अधिसुचना वित्त विभाग क्र. वेपुर-२०१९/प्र.क्र. १/सेवा-९, दि. ३०/०१/२०१९ अन्वये शासनाने ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू केलेल्या आहेत. व त्या अनुषंगाने नागपूर महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचारी यांना ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करणे बाबत महानगरपालिकेच्या प्रस्तावाचे अनुषंगाने नगर विकास विभागाचे शासन पत्र क्र.नामपा-२०१९/प्र.क्र. ६२/नवि-२६ दि. ०८ डिसेंबर २०२० नुसार नागपूर महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचा-यांना ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारीत वेतन श्रेणी दि ०१/०१/२०१६ पासून लागू करण्यास व प्रत्यक्ष वेतन दि. ०१/०९/२०१९ पासून मान्यता प्रदान केली आहे. त्या अनुषंगाने लेखा व वित्त विभाग म.न.पा. नागपूर यांचे कार्यालयीन परिपत्रक- ६७८/प्रलेविअ/२०२१ दि. ०८/०१/२०२१ नुसार नागपूर महानगरपालिकेच्या कर्मचा-यांना ७ वा वेतन आयोगानुसार सुधारीत वेतनश्रेणी दिनांक ०१/०१/२०१६ पासून काल्पनीक वेतनवाढी (Notional Increaments) देवून वेतन निश्चिती दि. ०१/०९/२०१९ पासून लाभ देवून त्यानुसार नागपूर महानगरपालिकेत उक्त शासन निर्णयानुसार अंमलबजावणी केलेली आहे.

महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक वेतन- १११९/प्र.क्र.३/सेवा-३, दिनांक १ जानेवारी २०१९ अन्वये राज्य वेतन सुधारणा समितीच्या शिफारशी नुसार १०, २० व ३० वर्षाच्या नियमित सेवेनंतर ३ लाभाची सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजना लागू करण्याबाबतच्या शिफारशी स्विकृत केलेल्या आहेत. तसेच काही महानगरपालिका तर्फे देखील उक्त शासन निर्णयाच्या तरतुदीनुसार तीन लाभाच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देवून १०, २० व ३० वर्षाच्या नियमित सेवेनंतर वरीष्ठ श्रेणी लागू करण्यात आली आहे.

सदर तीन लाभांच्या योजने बाबत शासनाने शासन निर्णय क्र. वेतन- १११९ / प्र.क्र.३ / २०१९ / सेवा - ३. दिनांक २ मार्च २०१९ अन्वये पुर्वीच्या अनुज्ञेय योजनेनुसार १२ / २४ वर्षानंतर (दि. ३१/१२/२०१५ पर्यत तसेच दि. ०१/०१/२०१६ ते दि. ३१/१२/२०१८ पर्यंतच्या कालावधीत), ज्या कर्मचारी/अधिकारी यांनी यथास्थिती पहिला व दुसरा लाभ घेतला आहे, त्यांना तसेच दि. ०१/०१/२०१९ नंतर शासन सेवेत सरळसेवा भरतीने नियुक्त होणा-या कर्मचा-यांना १०,२० व ३० वर्षानंतर अनुज्ञेय ठरणारी ३ लाभाची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना कश्याप्रकारे अनुज्ञेय करता येईल याबाबत अंमलबजावणी करणेसाठी उक्त शासन निर्णयात सविस्तर सुचना केल्या आहेत. त्या अनुषंगाने नागपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पात्र अधिकारी/कर्मचा-यांना सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशी नुसार १०, २० व ३० वर्षाच्या नियमित सेवेनंतर उक्त योजनेचा लाभ नागपूर महानगरपालिकेच्या कर्मचा-यांना मिळण्याबाबत कार्यालयीन पत्र क्र. ४५४/आस्थापना, दिनांक ०८/१२/२०२१ अन्वये मा. अवर सचिव नगर विकास विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडे सदर विषयी मार्गदर्शन मागविलेले आहे. या पत्राचे अनुषंगाने शासन स्तरावर मंजूरी मिळेल या धारणेवर महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचारी यांना देखील शासन निर्णय क्रमांक- वेतन- १११९/प्र.क्र.३/२०१९/सेवा-३, दि. ०२/०३/२०१९ च्या निर्णयातील तरतुदीनुसार नागपुर महानगरपालिकेत अधिकारी / कर्मचाऱ्यांना दि. ०१/०१/२०१६ पासुन काल्पनीक वेतनवाढी देऊन व वेतन निश्चितीचा लाभ

दि.०१/०९/२०१९ किंवा प्रत्यक्ष लाभ अनुज्ञेयतेच्या दिनांक यापैकी जे नंतर घडेल त्या दिनांकापासुन लागू राहील. परंतू जे कर्मचारी दि. ०१/०९/२०१९ पुर्वी ज्यांना १२ किंवा २४ वर्ष पुर्ण झालेली असेल त्यांना ६ वेतन आयोगानुसार पहिला / दुसरा लाभ अनुज्ञेय करुन सदर लाभाच्या दिनांकापासून त्यांना दिनांक ३१/०८/२०१९ पर्यंत ६ व्या वेतन आयोगानुसार थकबाकी अनुज्ञेय राहील व ७ वे वेतन आयोगानुसार सदरचे लाभ सुधारीत केल्यानंतर लाभाचे दिनांका पासून थकबाकी अनुज्ञेय न करता सदरची थकबाकी ही ७ व्या वेतन आयोगानुसार दिनांक ०१/०९/२०१९ पासून किंवा देय दिनांक त्यानंतरचा असल्यास त्या दिनांका पासून देय राहील.

तथापि दि. ०१/०१/२०१६ पुर्वी १२ किंवा २४ वर्षाची नियमीत सेवा होऊन, योजनेसाठी पात्रता असुन देखील १२/२४ लाभ अनुज्ञेय न केलेला असल्यास अशा प्रकरणी संबंधीत कर्मचा-यांना अनुज्ञेय असलेल्या दिनांकास १२/२४ वर्षानंतर आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय करुन त्या अनुषंगाने ६ व्या वेतन आयोगाप्रमाणे थकबाकी देय राहील. व शासन निर्णय दि. ०२/०३/२०१९ मधील तरतुदीच्या अनुषंगाने १०, २० व ३० वर्षानंतरच्या लाभाचे अनुषंगाने देय लाभ हा दि. ०१/०९/२०१९ पासून किंवा देय दिनांक ०१/०९/२०१९ नंतरचा असल्यास त्या देय दिनांका पासून ७ व्या वेतन आयोगाप्रमाणे वेतनातील फरक अनुज्ञेय राहील.

सदर प्रस्तावास मंजूरी देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :- सविस्तर टिपणी व कागदपत्रे नस्तीत उपलब्ध आहेत.

# पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 65/मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 11/06/2024

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सहा. आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय दि. ०२/०३/२०१९ अन्वये सातव्या वेतन आयोगामध्ये तीन लाभांच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेनुसार मंजूर केलेल्या १०, २० व ३० वर्षाच्या नियमित सेवेनंतर नागपूर महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचारी यांना उक्त शासन निर्णयातील तरतुदीनुसार सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या ३ लाभास मंजुरी देण्याचा प्रश्न विचारात घेऊन,

शासन अधिसुचना वित्त विभाग क्र. वेपुर-२०१९/प्र.क्र. १/सेवा-९, दि. ३०/०१/२०१९ अन्वये शासनाने ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू केलेल्या आहेत. व त्या अनुषंगाने नागपूर महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचारी यांना ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करणे बाबत महानगरपालिकेच्या प्रस्तावाचे अनुषंगाने नगर विकास विभागाचे शासन पत्र क्र.नामपा-२०१९/प्र.क्र. ६२/नवि-२६ दि. ०८ डिसेंबर २०२० नुसार नागपूर महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचा-यांना ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारीत वेतन श्रेणी दि ०१/०१/२०१६ पासून लागू करण्यास व प्रत्यक्ष वेतन दि. ०१/०९/२०१९ पासून मान्यता प्रदान केली आहे. त्या अनुषंगाने लेखा व वित्त विभाग म.न.पा. नागपूर यांचे कार्यालयीन परिपत्रक- ६७८/प्रलेविअ/२०२१ दि. ०८/०१/२०२१ नुसार नागपूर महानगरपालिकेच्या कर्मचा-यांना ७ वा वेतन आयोगानुसार सुधारीत वेतनश्रेणी दिनांक ०१/०१/२०१६ पासून काल्पनीक वेतनवाढी (Notional Increaments) देवून वेतन निश्चिती दि. ०१/०९/२०१९ पासून लाभ देवून त्यानुसार नागपूर महानगरपालिकेत उक्त शासन निर्णयानुसार अंमलबजावणी केलेली आहे.

महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक वेतन- १११९/प्र.क्र.३/सेवा-३, दिनांक १ जानेवारी २०१९ अन्वये राज्य वेतन सुधारणा समितीच्या शिफारशी नुसार १०, २० व ३० वर्षाच्या नियमित सेवेनंतर ३ लाभाची सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजना लागू करण्याबाबतच्या शिफारशी स्विकृत केलेल्या आहेत. तसेच काही महानगरपालिका तर्फे देखील उक्त शासन निर्णयाच्या तरतुदीनुसार तीन लाभाच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देवून १०, २० व ३० वर्षाच्या नियमित सेवेनंतर वरीष्ठ श्रेणी लागू करण्यात आली आहे.

सदर तीन लाभांच्या योजने बाबत शासनाने शासन निर्णय क्र. वेतन- १११९ / प्र.क्र.३ / २०१९ / सेवा - ३. दिनांक २ मार्च २०१९ अन्वये पुर्वीच्या अनुज्ञेय योजनेनुसार १२ / २४ वर्षानंतर (दि. ३१/१२/२०१५ पर्यंत तसेच दि. ०१/०१/२०१६ ते दि. ३१/१२/२०१८ पर्यंतच्या कालावधीत), ज्या कर्मचारी/अधिकारी यांनी यथास्थिती पहिला व दुसरा लाभ घेतला आहे, त्यांना तसेच दि. ०१/०१/२०१९ नंतर शासन सेवेत सरळसेवा भरतीने नियुक्त होणा-या कर्मचा-यांना १०,२० व ३० वर्षानंतर अनुज्ञेय ठरणारी ३ लाभाची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना कश्याप्रकारे अनुज्ञेय करता येईल याबाबत अंमलबजावणी करणेसाठी उक्त शासन निर्णयात सविस्तर सुचना केल्या आहेत. त्या अनुषंगाने नागपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पात्र अधिकारी/कर्मचा-यांना सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशी नुसार १०, २० व ३० वर्षाच्या नियमित सेवेनंतर उक्त योजनेचा लाभ नागपूर महानगरपालिकेच्या कर्मचा-यांना मिळण्याबाबत कार्यालयीन पत्र क्र. ४५४/आस्थापना, दिनांक ०८/१२/२०२१ अन्वये मा. अवर सचिव नगर विकास विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडे सदर विषयी मार्गदर्शन मागविलेले आहे. या पत्राचे अनुषंगाने शासन स्तरावर मंजूरी मिळेल या धारणेवर महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचारी यांना देखील शासन निर्णय क्रमांक- वेतन- १११९/प्र.क्र.३/२०१९/सेवा-३, दि. ०२/०३/२०१९ च्या निर्णयातील तरतुदीनुसार नागपुर महानगरपालिकेत अधिकारी / कर्मचाऱ्यांना दि. ०१/०१/२०१६ पासुन काल्पनीक वेतनवाढी देऊन व वेतन निश्चितीचा लाभ दि.०१/०९/२०१९ किंवा प्रत्यक्ष लाभ अनुज्ञेयतेच्या दिनांक यापैकी जे नंतर घडेल त्या दिनांकापासुन लागू राहील. परंतू जे कर्मचारी दि. ०१/०९/२०१९ पुर्वी ज्यांना १२ किंवा २४ वर्ष पुर्ण झालेली असेल त्यांना ६ वेतन आयोगानुसार पहिला / दुसरा लाभ अनुज्ञेय करुन सदर लाभाच्या दिनांकापासून त्यांना दिनांक ३१/०८/२०१९ पर्यंत ६ व्या वेतन आयोगानुसार थकबाकी अनुज्ञेय राहील व ७ वे वेतन आयोगानुसार सदरचे लाभ सुधारीत केल्यानंतर लाभाचे दिनांका पासून थकबाकी अनुज्ञेय न करता सदरची थकबाकी ही ७ व्या वेतन आयोगानुसार दिनांक ०१/०९/२०१९ पासून किंवा देय दिनांक त्यानंतरचा असल्यास त्या दिनांका पासून देय राहील.

तथापि दि. ०१/०१/२०१६ पुर्वी १२ किंवा २४ वर्षाची नियमीत सेवा होऊन, योजनेसाठी पात्रता असुन देखील १२/२४ लाभ अनुज्ञेय न केलेला असल्यास अशा प्रकरणी संबंधीत कर्मचा-यांना अनुज्ञेय असलेल्या दिनांकास १२/२४ वर्षानंतर आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय करुन त्या अनुषंगाने ६ व्या वेतन आयोगाप्रमाणे थकबाकी देय राहील. व शासन निर्णय दि. ०२/०३/२०१९ मधील तरतुदीच्या अनुषंगाने १०, २० व ३० वर्षानंतरच्या लाभाचे अनुषंगाने देय लाभ हा दि. ०१/०९/२०१९ पासून किंवा देय दिनांक ०१/०९/२०१९ नंतरचा असल्यास त्या देय दिनांका पासून ७ व्या वेतन आयोगाप्रमाणे वेतनातील फरक अनुज्ञेय राहील.

सदर प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.